नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११९ Issue - 119 | वार - बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६ Blow- Wednesday Date 23 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## दुष्काळ निवारणासाठी उपसमिती गठीत; सर्व मंत्री-आमदार बांधावर दिसतील

### मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या दीड महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. शेतातील खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून सोयाबीन वाळून गेलाय. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान झाल्याचं प्रथम दर्शनी दिसून येते. त्याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाई जाहीर करण्याची मागणी केली जात आहे.

राज्यात दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. तर, विविध शेतकरी संघटनाही रस्त्यावर उतरत आ-हेत. त्याच पार्श्वभूमीवर आज मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांना माहिती दिली. शेतकऱ्यांच्या शेतीच्या नुकसानीसंदर्भात उद्यापासून पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, त्यासाठी फिल्डवरुन माहिती गोळा केली जाईल. बहूतांश भागात पीकं करपली आहेत. सोयाबीन आणि कापूस पिकांवर सर्वाधिक परिणाम झाला आहे, कोकणात भातावर परिणाम



झाला आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंचनाम्याचे आदेश दिल्याची माहिती दिली. विशेष करुन ऋपिण्याचं पाणी आणि जनावरांचा चारा यावर लक्ष द्यायच ठरलं आहे. ऋमहापालिका, नगरपालिका आणि पंचायत राज संस्था यांच्याकडे पिण्याच्या पाणीसंदर्भातील निर्णय दिले आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, पंकजा मुंडे, बाबासाहेब पाटील अन्य मंत्री असतील, समितीचे सचिव हे मुख्य सचिव असतील, दुष्काळ संदर्भात अपडेट या समितीकडे दिले जा-तील. या उपसमितीला अधिकार दिले आहेत, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली. मी ही उद्या दौरा करणार आहे, ऋसर्व मंत्री आणि आमदार बांधावर जातील. एनडीआरएफचे काही नियम आहेत, त्यानुसार प्रक्रिया सुरू राहिलऋ. मात्र, आम्ही वाट पाहणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दुष्काळ निव-ारण मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्ष तर मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील, पंकजा मुंडे, दत्तात्रय भरणे, जयकुमार गोरे, संजय राठोड, प्रताप सरनाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील हे सदस्य असणार आहेत. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल हे देखील उपसमितीचे सदस्य सचिव असतील.

**मुख्यमंत्री शेतकऱ्यांना मदत करत नाहीत - सपकाळ**

गणपती उत्सव सुरू आहे, दुष्काळ संकट आहे. डखठ साठी मुदतवाढ द्यावी अशी आमची मागणी होती, ती देण्यात आली नाही. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडला जातो. त्यामध्ये लोकसंख्येनुसार आर्थिक तरतूद केली जाते. आता, लोकसंख्या आकडा कमी झाला आहे. आपोआप आता आर्थिक तरतूद देखील कमी होईल.

डखठ मुळे मतदार कमी करत आहे. महाराष्ट्राचे सुलतान देवेंद्र फडणवीस एकीकडे शेतकरी संकटात आहेत, त्यांना मदत करत नाहीत दुसरीकडे मतदार देखील कमी केले जात आहेत, असे म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली.

## शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढणं आमचं काम; दुष्काळी पंचनामे करण्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कॅबिनेटमध्ये दुष्काळावर चर्चा झाल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे यावर चर्चा करण्यात आली. दरम्यान, नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री देखील काही भागात स्वत: जातील. मी देखील काही भागात पाहाणी दौरा करणार असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

पिकं पावसाअभावी गेली आहेत, शेतकरी संकटात आहेत. बळीराजा अन्नदाता आहे, अशात



सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क त्यांचा आहे असेही एकनाथ शिंदे म्हणाले. त्याला संकटातून बाहेर काढणं आमचं काम आहे. आपण अनेक वेळेस मदत केली आहे, मदतीच्या आकडेवारीत मी जात नाही. दसरा दिव-ाळीत संकट आले, अतिवृष्टी आली तेव्हा देखील आपण मदत केली. सरकार गंभीर आहे, मंत्री महोदयांनी त्याची दखल घेतली आहे. अधिकारी बांधावर जाईल आणि नुकसान झालं आहे ते म ोजलं जाईल आणि पंचनामे केले जाईल. केंद्र सरकारने देखील वारंवार मदत केली आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. मी शिवसेनेच्या मंत्र्यांना आपआपल्या भागात जाण्याच्या सूचना दिल्या आहेत असे एकनाथ शिंदे म्हणाले. सगळ्या गोष्टींवर चर्चा झाली आहे, येणाऱ्या. १ ते २ महिन्यात सरकार म्हणून मदत करेलच मात्र शिवसेना देखील मदतीला धावेल असे एकनाथ शिंदे म्हणाले. शिवसेना देखील काही जबाबदारी घेईल असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं जाणार नाही असेही ते म्हणाले.

## सण उत्सवासह मिरवणुकीत सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्याना होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाची गंभीर दखल घेतली आहे. उच्च न्यायालयानं काल सुमोटो दाखल करुन घेत सरकारला आज बाजू मांडण्यास सांगितलं होतं. न्यायमूर्ती जीएस कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठानं ध्वनीप्रदूषण प्रकरणावर दोनवेळा सुनावणी घेतली. मुंबई उच्च न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी घातली आहे.

मुंबई हायकोर्टात राज्य सरकारनं बाजू मांडताना परवानगी फक्त मिरवणुकीला देण्यात आली असून ध्वनिक्षेपकांना कोणतीही परवानगी नाही असं म्हटलं. ध्वनिक्षेपकांचा वापर करताना मर्यादेच्या अधीन राहणे बंधनकारक असल्याचं राज्य सरकारनं कोर्टात बाजू मांडताना म्हटलं. तसेच लेसर लाईटच्या वापरला तसेच मिरवणुकीत फटाके फोडायला कोणतीही परवानगी नाही, असं राज्य सरकारकडून उच्च न्यायालयामध्ये स्पष्ट केलं.

राज्य सरकारच्या शांतता क्षेत्रांच्या यादीत रुग्णालय आणि शाळांसह धार्मिक स्थळ देखील शांतता क्षेत्रात मोडतात. मग गणपती मंडप देखील शांततात क्षेत्रात मोडू शकतात मात्र त्यासाठी ते सूचीबद्ध करावं लागेल अशी भूमिका राज्य सरकारनं कोर्टात मांडली.

धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी उच्च न्यायालयानं घातली आहे. तसेच ध्वनी प्रदूषणाची मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे तसेच उपकरणांची जप्ती करण्याचे आदेश



उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत.

ढोल ताशा पथकांमध्ये हातोड्याने बडवण्यात येणाऱ्या सिलेंडरवर देखील बंदी घालण्यात आली आहे. मंडळांना त्यांना दिलेली परवानगी जाहीर प्रदर्शित करावी लागेल. परवानगी प्रदर्शित न केल्यास ध्वनिक्षेपक लावता येणार नाही उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच भविष्यात परवानगी देताना अनामत रक्कम घेण्याच्या सूचना उल्लंघन समोर आल्यास अनामत रक्कम जप्त करण्याच्या सूचना उच्च न्यायालयानं दिल्या आहेत. ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणासंदर्भात नियमावली स्पष्ट आहे. तरी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी येतात, मग हे थांबवणार कसं? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला विचारला आहे. मुंबईत ९१ पो-लीस ठाणी असून प्रत्येक पोलीस ठाण्याची भरारी पथक कारवाई करतात अशी माहिती राज्य सरकारनं न्यायालयात दिली.तसेच कायद्यानुसार उपकरण जप्त करण्याची देखील तरतूद आल्याची माहिती राज्य सरकारनं कोर्टात दिली. सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाकडून पंढरपूरच्या वारीचा उल्लेख करण्यात आला. वारी हजारो लोक करतात त्यात टाळ वाजवला जातो आणि तिथे ध्वनी प्रदूषण होत नाही, असं कोर्टानं म्हटलं.


गुजरातमध्ये ७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

## यामी गौतम, कार्तिक आर्यन आणि मम्मुट्टी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गुजरात : ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा झाल्यानंतर दोन महिन्यांनी, मंगळव-ारी (२२ सप्टेंबर) गुजरात येथील एकता नगरमध्ये या प्रतिष्ठित पुरस्कार सोहळ्याचे अतिशय भव्य आयोजन करण्यात आले. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध श्रेणींमधील विजेत्या कलाकारांना आणि तंत्रज्ञांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या विशेष सोहळ्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत 'सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन' कडून प्रमाणपत्र मिळालेल्या उत्कृष्ट चित्रपट आणि कलाकृतींचा गौरव करण्यात आला.







पुरस्कार सोहळ्यातील प्रमुख विजेत्यांमध्ये बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतम हिचा समावेश होता. 'आर्टिकल ३७०' या चित्रपटातील तिच्या अत्यंत प्रभावी आणि दमदार अभिनयासाठी तिला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय, 'आर्टिकल ३७०' या चित्रपटाला 'सर्वोत्कृष्ट वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट' चा बहुमानही मिळाला. त्यामुळे यामी गौतम आणि तिच्या संपूर्ण टीमसाठी हा क्षण अत्यंत विशेष आणि अभिमानास्पद ठरला. या सोहळ्यासाठी यामी गौतमने अत्यंत आकर्षक आणि काळ्या रंगाच्या पारंपरिक साडीत हजेरी लावली होती. तिच्यासोबत तिचे पती आणि 'आर्टिकल ३७०' चित्रपटाचे निर्माते आदित्य धर हेदेखील उपस्थित होते. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटातील उत्कृष्ट कामगिरीसाठी यामीला राष्ट्रपतींच्या हस्ते हा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.

दुसरीकडे, 'चंदू चॅम्पियन' या चित्रपटातील अप्रतिम कामगिरीसाठी अभिनेता कार्तिक आर्यनला 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्तिक आर्यनने हा सन्मान मल्याळम सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते मम्मुट्टी यांच्यासोबत सामायिक केला. मम्मुट्टी यांना त्यांच्या 'भ्रमयुगम' या मल्याळम चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दोघांनीही आपापले पुरस्कार स्वीकारले. दिग्दर्शन क्षेत्रात 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटातून पदार्पण करणाऱ्या रणदीप हुड्डाला 'सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शक' चा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर दुसरीकडे, 'अमरन' या चित्रपटाच्या उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी राजकुमार पेरियासामी यांना 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक' या पुरस्काराने गौरविण्यात आले. गुजरातच्या एकता नगर येथे आयोजित या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हिंदी, मल्याळम, तमिळ आणि इतर प्रादेशिक चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व तंत्रज्ञांची उपस्थिती पाहायला मिळाली. भारतीय सिनेसृष्टीतील अभूतपूर्व योगदानाबद्दल या सर्व कलाकारांचा एकाच व्यासपीठावर विशेष सन्मान करण्यात आला.

**७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची संपूर्ण विजेती यादी**

**सर्वोत्कृष्ट वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट : आर्टिकल ३७०**

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री: यामी गौतम (आर्टिकल ३७०)

सर्वोत्कृष्ट अभिनेता: कार्तिक आर्यन (चंदू चॅम्पियन) आणि मम्मुट्टी (भ्रमयुगम)

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन: राजकुमार पेरियासामी (अमरन)

सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपट (करमणूक): कल्की २८९८ एडी

सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शक: रणदीप हुड्डा (स्वातंत्र्यवीर सावरकर)

सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट: श्रीकांत

सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट: मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी

सर्वोत्कृष्ट तेलुगू चित्रपट: कमिटी कुर्रोळ्ळू

सर्वोत्कृष्ट तमिळ चित्रपट: रायन

सर्वोत्कृष्ट मल्याळम चित्रपट: फेमिनीची फातिमा

सर्वोत्कृष्ट कन्नड चित्रपट: मिथ्या

सर्वोत्कृष्ट गुजराती चित्रपट: मारण

सर्वोत्कृष्ट बंगाली चित्रपट: चालचित्र एकॉन

सर्वोत्कृष्ट आसामी चित्रपट: जुईफूल

सर्वोत्कृष्ट उडिया चित्रपट: लहरी

सर्वोत्कृष्ट मणिपुरी चित्रपट: सुनिता

सर्वोत्कृष्ट तुळू चित्रपट: इंबू

सर्वोत्कृष्ट गडवाली चित्रपट: ढोली

सर्वोत्कृष्ट ॲक्शन दिग्दर्शन: अनल अरसू - महाराजा (तमिळ)

सर्वोत्कृष्ट नृत्य दिग्दर्शन : विजय गांगुली - स्त्री २ (आज की रात)

सर्वोत्कृष्ट गीतकार: मनोज मुंतशिर - मैदान (जाने दो)

सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत : जी. व्ही. प्रकाश कुमार (अमरन)

सर्वोत्कृष्ट संगीत (गाणी): शाश्वत सचदेव (आर्टिकल ३७०)

सर्वोत्कृष्ट मेक-अप: पी. रवी कुमार (कमिटी कुर्रोळ्ळू)

सर्वोत्कृष्ट कॉस्ट्यूम (वेशभूषा): दीपिका नूर आणि शीतल शर्मा (पुष्पा २)

सर्वोत्कृष्ट संकलन : आर. कलैवानन (अमरन)

सर्वोत्कृष्ट साऊंड डिझाइन: मानस चौधरी (भुल भुलैया ३)

सर्वोत्कृष्ट पटकथा ( सुकुमार (पुष्पा २)

सर्वोत्कृष्ट छायांकन : शेहनाद जलाल (भ्रमयुगम)

सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री: रूपाश्री वोर्काडी (मिथ्या) आणि सा-चना नामिदास (महाराजा)

सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता: संजय मिश्रा (भक्षक)

विशेष उल्लेख (डशिलळरश्र चशपींळेप): धनुष ('कॅप्टन मिलर' चित्रपटासाठी)

## संपादकीय....

## उच्च न्यायालयाचे निर्देश

धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी उच्च न्यायालयानं घातली आहे. तसेच ध्वनी प्रदूषणाची मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे तसेच उपकरणांची जप्ती करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. ढोल ताशा पथकांमध्ये हातोड्याने बडवण्यात येणाऱ्या सिलेंडरवर देखील बंदी घालण्यात आली आहे. मंडळांना त्यांना दिलेली परवानगी जाहीर प्रदर्शित करावी लागेल. परवानगी प्रदर्शित न केल्यास ध्वनिक्षेपक लावता येणार नाही उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच भविष्यात परवानगी देताना अनामत रक्कम घेण्याच्या सूचना उल्लंघन समोर आल्यास अनामत रक्कम जप्त करण्याच्या सूचना उच्च न्यायालयानं दिल्या आहेत. ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणासंदर्भात नियमावली स्पष्ट आहे. तरी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी येतात, मग हे थांबवणार कसं? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला विचारला आहे. मुंबईत ९१ पोलीस ठाणी असून प्रत्येक पोलीस ठाण्याची भरारी पथक कारवाई करतात अशी माहिती राज्य सरकारनं न्यायालयात दिली.तसेच कायद्यानुसार उपकरण जप्त करण्याची देखील तरतूद आल्याची माहिती राज्य सरकारनं कोर्टात दिली. सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाकडून पंढरपूरच्या वारीचा उल्लेख करण्यात आला. वारी हजारो लोक करतात त्यात टाळ वाजवला जातो आणि तिथे ध्वनी प्रदूषण होत नाही, असं कोर्टानं म्हटलं. मुंबई हायकोर्टात राज्य सरकारनं बाजू मांडताना परवानगी फक्त मिरवणुकीला देण्यात आली असून ध्वनिक्षेपकांना कोणतीही परवानगी नाही असं म्हटलं. ध्वनिक्षेपकांचा वापर करताना मर्यादेच्या अधीन राहणे बंधनकारक असल्याचं राज्य सरकारनं कोर्टात बाजू मांडताना म्हटलं. तसेच लेसर लाईटच्या वापरला तसेच मिरवणुकीत फटाके फोडायला कोणतीही परवानगी नाही, असं राज्य सरकारकडून उच्च न्यायालयामध्ये स्पष्ट केलं.

## राहुल गांधींच्या फोन नंतर चिखलीचे माजी आमदार राहुल बोंद्रेंचा भाजपप्रवेश रद्द

### भावुक होत म्हणाले, 'काहीही झाले तरी चालेल पण काँग्रेस मध्येच राहणार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी नाट्यमय घडामोडी समोर आली असून, बुलढाणा जिल्ह्यातील चिखली विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांचा भारतीय जनता पक्षात २२ सप्टेंबर रोजी महाराष्ट्राचे





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा भारतीय जनता पार्टी चे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.श्वेता ताई महाले यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष प्रवेश होणार होता व चिखली विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे भाजपा मध्ये पक्ष प्रवेश करुन राजकारणातून निवृत्ती घेणार होते परंतु अखेरच्या क्षणी रद्द झाला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी ऐन मोक्याच्या वेळी दूरध्वनीवरून राहुल बोंद्रे यांच्याशी संवाद साधल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. या फोननंतर अत्यंत भावुक झालेले राहुल बोंद्रे यांना अश्रू अनावर करत, तुमच्या नेतृत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे; माझे सर्वस्व गेले तरी चालेल, पण मी लढत राहीन, असा निर्धार व्यक्त केला.

**राजकीय दबावातून पक्षप्रवेशाचा निर्णय?**

मिळालेल्या माहितीनुसार, चिखली मतदारसंघातील भाजप आमदारांकडून आणि स्थानिक नेत्यांकडून राहुल बोंद्रे यांना सातत्याने टार्गेट केले जात होते. त्यांच्यावर विविध गुन्हे दाखल करून त्यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू होता. या सततच्या त्रासाला आणि वाढत्या दबावाला कंटाळून माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी अखेर भाजपमध्ये प्रवेश करून राजकारणातून निवृत्ती घेण्याची तयारी दर्शवली होती. त्यांचा पक्षप्रवेश जवळपास निश्चित मानला जात होता.

**राहुल गांधींचा फोन आणि नाट्यमय वळण**

मात्र, पक्षप्रवेशाच्या पूर्वसंध्येलाच राहुल गांधी यांनी थेट राहुल बोंद्रे यांच्याशी संपर्क साधला. राहुल गांधी यांनी बोंद्रे यांच्याशी संवाद साधून पक्षाचा त्यांच्यावर असलेला विश्वास व्यक्त केला आणि त्यांना धीर दिला. राहुल गांधींचा फोन येताच राहुल बोंद्रे यांना अश्रू अनावर झाले आणि ते ढसाढसा रडले.

राहुल गांधींशी बोलताना बोंद्रे भावुक होऊन म्हणाले, माझ्यावर कितीही अन्याय झाला, गुन्हे दाखल झाले किंवा माझे सर्वस्व पणाला लागले, तरी मी तुमच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काँग्रेससोबतच राहीन आणि या अन्यायाविरोधात लढेन.

**बुलढाणा जिल्ह्यातील राजकारणात भाजपची रणनीती अपयशी**

चिखली आणि बुलढाणा जिल्ह्यात काँग्रेसचा एक महत्त्वाचा चेहरा म्हणून राहुल बोंद्रे ओळखले जातात. त्यांना पक्षात घेऊन काँग्रेसला खिंडार पाडण्याचा भाजपचा प्लॅन होता. मात्र, राहुल गांधी यांच्या एका फोनमुळे भाजपची ही रणनीती पूर्णपणे फसली आहे. राहुल बोंद्रे यांच्या या निर्णयामुळे चिखलीतील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह संचारला असून स्थानिक राजकारण चांगलेच तापले आहे.

# कामगार शक्तीची प्रेरणा- गिरणी कामगार संघटना

**(२३-२९ सप्टेंबर: मुंबई गिरणी कामगार संघटना स्थापन दिन सप्ताह.)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नारायण मेघाजी लोखंडे यांच्या अथक परिश्रम आणि तीव्र इच्छाशक्ती व जिद्दीने ब्रिटीशकालीन भारतामध्ये पहिली गिरणी कामगार संघटना सन १८८४ मध्ये बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन या नावाने स्थापन झाली. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता अशिक्षीत, अज्ञानी व अप्रगत कामगार कष्टकरी वर्गाला एकत्र करुन त्यांच्यामध्ये हक्काची, कर्तव्याची जाणीव करून देऊन त्याचे रुपांतर एका संघटीत शक्तीत करणे, हे एक दिव्य कार्य त्यांच्या सहकाऱ्यांच्या साथीने घडवून आणले. एका व्यापक अर्थाने असंघटीतांना संघटीत करण्याचा हा एक यशस्वी प्रयोग तत्कालीन परिस्थितीत नारायण मेघाजी लोखंडे यांनी केला. पुढे पुढे कामगार शक्ती एकवटू लागली आणि कामगार चळवळ व्यापक होऊ लागली. कामगार चळवळीला एक दिशा मिळत गेली. पुढे विसाव्या शतकात अनेक कामगार संघटना उदयाला आल्या. त्यातून कामगारांचे हितसंबंध जपण्याचा व संवर्धनाचा प्रयत्न होऊ लागला. पण या सर्वांचे मूळ, हे नारायण मेघाजी लोखंडे यांच्या बॉम्बे मिल हँड्स असोसिएशनमध्ये दिसून येते. संघटना बांधण्याचे असे हे क्रांतीकारक पाऊल त्याकाळात नारायण मेघाजी लोखंडे यांनी उचलले. हे समग्र कामगार चळवळीच्या दृष्टीने ऐतिहासिक पाऊल होते. त्यामुळे नारायण मेघाजी लोखंडे हे भारताच्या कामगार चळवळीचे आद्य प्रवर्तक, प्रणेते म्हणून संबोधले जातात. सत्यशोधक- श्री कृष्णकुमार आनंदी-घोविंदा निकोडे गुरुजींचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख वाचकांन समर्पित जी.....संपादक.

चळवळीतील चैतन्याचा महामेरु : नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार क्षेत्रातील योगदान म्हणजे ज्वलंत ऐतिहासिक कामगार चळवळ होय. त्यावर टाकलेला हा संक्षिप्त दृष्टिक्षेप - कापड गिरणीमध्ये नारायण मेघाजी लोखंडे स्वत: काम करीत असल्यामुळे तेथील अमानवी स्थितीची चीड त्यांच्या मनात खदखदत होती. याची ठिणगी म्हणजे स्वत: कापड गिरण्यांमध्ये जाऊन कामगारांना संघटीत करुन निर्माण केलेली बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन ही कामगारांच्या प्रचंड अशा उत्स्फूर्त प्रतिसादातून तयार झालेली देशातील पहिली कामगार संघटना. मुंबई सरकारने सन १८८१च्या फॅक्टरी क्टमध्ये सुधारणा करण्यासाठी सन १८८४ मध्ये कलेक्टर डब्ल्यु. बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिशनला कामगारांच्या मागण्या सादर करता याव्यात यासाठी त्यांनी दोन ऐतिहासिक सभा घेतल्या. त्याचा उल्लेख याठिकाणी करणे अनिवार्य आहे. पहिली ऐतिहासिक जाहीर सभा नारायण मेघाजी लोखंडेंच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ सप्टेंबर १८८४ रोजी सायं. सुपारीबाग, परळ येथे सुमारे ४,००० कामगारांच्या उपस्थितीत पार पडली. लगेच दुसरी जाहीर सभा दिनांक २६ सप्टेंबर १८८४ रोजी भायखळा येथे घेण्यात आली. या सभेलाही कामगारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या दोन्ही सभांमध्ये कामगारांच्या मागण्यांचे ठराव संमत केले. ५,५०० कामगारांनी सह्या केलेले मागण्यांचे पिटिशन दिनांक १५ ऑक्टोबर, १८८४ रोजी फॅक्टरी कमिशनला सादर केले. त्यामध्ये प्रामुख्याने ५ मागण्या केल्या होत्या - १) गिरणी कामगारांना आठवडयातून एक दिवस रविवारी सुट्टी देण्यात यावी. २) दुपारी अर्धातास जेवणाची सुट्टी देण्यात यावी. ३) कामगारांची कामाची वेळ निश्चित करण्यात यावी. ४) कामगारांचा पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत देण्यात यावा. ५) कामावर असताना जर कुणाला गंभीर जखम झाली तर तो बरा होईपर्यंत पूर्ण पगार देण्यात यावा. जर कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी. परंतु या मागण्यांबाबत निर्णय लवकर होत नव्हता, म्हणून पुन्हा दिनांक २० नोव्हेंबर १८८९ रोजी साडेसहा हजार कामगारांनी सह्या केलेला अर्ज सरकारला सादर केला. शेवटी तीव्र आंदोलन उभारावे लागले. दिनांक २४ एप्रिल, १८९० रोजी नारायण मेघाजी लोखंडे यांनी महालक्ष्मीच्या रेसकोर्स मैदानावर कामगारांची प्रचंड सभा आयोजित केली. सुमारे १०,००० कामगार या सभेला उपस्थित होते. विशेष म्हणजे दोन कामगार स्त्रियांनी या सभेत भाषणे करुन आपल्या व्यथा समाजापुढे मांडल्या. या घटनेला अनेक बाजूंनी महत्व होते. ही घटना म्हणजे लोखंडेंच्या कामगार चळवळीने समाजजागृतीचा एक टप्पा पूर्ण केल्याचे प्रतिक होते. तसेच, ब्रिटीश सरकार आणि मालक वर्गाच्या विवेकबुध्दीला केलेले ते आवाहन होते आणि विशेष म्हणजे बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनने रविवार दिनांक १० जून १८९० रोजी कामगारांना दर रविवारी सुट्टी देण्याचा निर्णय जाहीर केला. हे त्या सभेचे फलित होते. यामुळे, भारताला रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळण्याचे कार्य पूर्ण झाले. समग्र भारतातील कष्टकरी शक्तीच्या एकजुटीने मिळविलेला हा पहिला महत्वपूर्ण विजय होता. हा विजय म्हणजे कामगार चळवळीचा आत्मविश्वास वाढीला लागून कामगार चळवळ अधिक सक्षम होण्यास व तिची व्याप्ती वाढण्यास कारणीभूत ठरला असे म्हटले तर वावगे ठरु नये. पुढे सन १८९१ साली नवा फॅक्टरी क्ट मंजूर केला व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी दिनांक १ जानेवारी १८९२ पासून सुरु झाली. या क्टच्या निर्मितीसाठी नारायण मेघाजी लोखंडे यांनी कमिशनला जे महत्वपूर्ण सहकार्य केले, त्याचा विशेष उल्लेख कमिशनने आपल्या अहवालात केलेला आहे. बाल कामगारांच्या वयाची व वेळेची मर्यादा, शिक्षणाची संधी तसेच स्त्रियांच्या वेळेची मर्यादा या नव्या तरतुदी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या सत्यशोधकी आग्रहातून निर्माण झाल्या होत्या. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मे २००५ मध्ये भारत सरकारच्या पोस्ट खात्याने त्यांची नारायण मेघाजी लोखंडे यांच्यावरील टपाल तिकिटाचे प्रकाशन केले. हा प्रकाशन सोहळा तत्कालीन मा.पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी मा.पंतप्रधानांनी काढलेले गौरवोद्गार पुढीलप्रमाणे- भारताच्या कामगार चळवळीचे पितामह कै. नारायण मेघाजी लोखंडे हे केवळ कामगारांचे नेते नव्हते तर गोर-गरीब कष्टकरी महिला यांचे जीवन समृध्द करण्यासाठी तसेच हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी कार्य करणारे समाजसुधारकही होते.

या सर्वंकष बदलासाठी झटणारे निर्भीड पत्रकार लोखंडे : बहुजन समाजाच्या हितासाठी, ब्राम्हणेतरांचे पहिले वृत्तपत्र कृष्णराव भालेकर यांनी दिनांक १ जानेवारी १८७७ मध्ये ''दीनबंधु'' या नावाने पुण्यामध्ये सुरु केले. अनेक अडचणींचा मुकाबला करत सातत्याने ३ वर्ष हे वृत्तपत्र भालेकरांनी मोठ्या जिद्दीने चालविले. परंतु जेव्हा सर्व बाजूंनी नाईलाज झाला, तेव्हा भालेकरांना दीनबंधु वृत्तपत्राची जबाबदारी सोडावी लागली. ''दीनबंधु'' चालू ठेवणे सर्वांनाच आवश्यक वाटत होते. म्हणून नारायण मेघाजी लोखंडे आणि रामजी संतुजी आवटे यांनी ''दीनबंधु'' मुंबईस आणला. मुंबईत दोघांनी भागीदारीत हे वृत्तपत्र सुरु केले. संपादनाची मुख्य जबाबदारी नारायण मेघाजी लोखंडे यांच्याकडे होती. दिनांक ९ मे १८८० रोजी मुंबईहून ''दीनबंधु'' चा पहिला अंक प्रसिध्द झाला. त्याच्या मुखपृष्ठावर ''गेीपरश्र वर्शीेंशव ें ंहिश ळपींशीशीर्ी ष्ुेझळपस लश्ररीी'' असे छापलेले असे. यावरुन ''दीनबंधु'' हे कष्टकरी वर्गाच्या हिताचे वृत्तपत्र असल्याचे स्पष्ट होते. नारायण मेघाजी लोखंडे यांचे संपादकीय लिखाण हे अतिशय प्रभावी आणि रांगडया मराठीत असे. एखादया मुद्यावर आपली मते मांडतांना अतिशय रोखठोक आणि निर्भीडपणे प्रतिपक्षाच्या एकेक मुद्याचा धुव्वा उडवावा असे बोलीभाषेसारखे त्यांचे लिखाण असे. त्यांचे लिखाण वाचताना ते स्वत: आपल्यासमोर उभे राहून आपले दु:ख मांडत असल्याचे चित्र उभे करायचे. प्रमाणभाषेपलीकडे जाऊन बहुजनांच्या प्रचलित बोलीभाषेचा वापर ते त्यामधून करीत आणि त्यामुळे ते अज्ञानी बहुजन समाजाचे प्रतिनिधीत्व समर्थपणे करतात, याची जाणीव होत असे.

सामाजिक विषयावरील लिखाणाला ''दीनबंधु'' मध्ये अग्रस्थान असे. सुरुवातीच्या अंकातून शुद्रातिशुद्रांसाठी मोफत आणि सार्वत्रिक शिक्षणाची मोहीम राबविली जावी, यासंबंधी पाठपुरावा केलेला आढळतो. देशाचे भवितव्य हे कष्टकऱ्यांच्या श्रमावर, उत्पादकतेवर अवलंबून असल्यामुळे सरकारने त्यांच्या शिक्षणासाठी वाहून घ्यायला हवे अशा आशयाचे लिखाण तत्कालीन परिस्थितीत करुन तसे सरकारला करावयास भाग पाडणारे निर्भिड पत्रकार हा एक अत्यंत महत्वाचा पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वाचा दिसून येतो. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये शुद्रातिशुद्रांसाठी विशेष संधी देण्यात यावी, राखीव जागा ठेवाव्यात, यासाठी ''दीनबंधु'' च्या माध्यमातून त्यांनी सातत्याने आग्रह धरल्याचे दिसून येते. यातून नारायण मेघाजी लोखंडेच्या विशाल दूरदृष्टीचा प्रत्यय आज प्रत्येकाला आल्याशिवाय राहणार नाही. सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करुन समाजामध्ये समता प्रस्थापित करावयाची असेल, तर या बाबींशिवाय पर्याय नाही, हे नारायण मेघाजी लोखंडे यांनी सव्वाशे वर्षापूर्वी ओळखले होते. आज या अनुषंगाने ज्या काही सुधारणा होत आहेत. त्या पाठीमागे नारायण मेघाजी लोखंडे सारख्या समाजसुधारक विचारवंताचे योगदान आहे हे अधोरेखित होते. एकूण ''दीनबंधु'' हे ब्राम्हणेतरांचे, कष्टकऱ्यांचे केवळ वृत्तपत्र नव्हते तर ती त्यांची चळवळ बनली होती. नारायण मेघाजी लोखंडेनी आपल्या निर्भीड पत्रकारितेच्या जोरावर ''दीनबंधु'' ला समाजातल्या सर्वंकष बदलाचे माध्यम बनवले व चळवळीची ताकद वाढवली.

जिक परिवर्तनाच्या चळवळीतील सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे : तत्कालिन परिस्थितीत प्रवाहाविरुध्द भूमिका घेण्याचे सामर्थ्य ज्या काही मोजक्या समाजधुरिणांमध्ये होते. त्यापैकी एक म्हणजे नारायण मेघाजी लोखंडे होत. महात्मा फुले हे एक तत्त्वचिंतक-समाजसुधारक होते. सत्यशोधक समाजाची निर्मिती करुन त्यांनी शुद्रातिशुद्रांच्या उत्कर्षाचे नवे तत्त्वज्ञान मांडले. नारायण मेघाजी लोखंडेनी त्या तत्त्वज्ञानावर आधारीत कष्टकऱ्यांची चळवळ उभारली. एक निष्ठावंत सहकारी म्हणून लोखंडे फुलेंच्या चळवळीत आघाडीवर असलेले दिसतात. जोतीरावांच्या महत्कार्याबद्दल त्यांना महात्मा पदवी देण्याचा कार्यक्रम नारायण मेघाजी लोखंडेनी आखला आणि जोतीरावांच्या मृत्यूसमयी त्यांच्या जवळ असणारे ज्येष्ठ सहकारी म्हणून नारायण मेघाजी लोखंडे होते. सन १८९३ साली मुंबईत उसळलेल्या हिंदू-मुस्लिमांच्या भीषण जातीय दंगलीच्या प्रसंगी नारायण मेघाजी लोखंडे यांनी केलेले कार्य अत्यंत महत्वपूर्ण आणि आदर्शवत आहे. धर्माच्या नावावर कष्टकऱ्यांमध्ये, समाजामध्ये फूट पडू नये म्हणून त्यांनी मोहल्या-मोहल्यात फिरुन, रिलीफ फंड काढून दंगलग्रस्तांना सहाय्य करुन समाज निर्भय बनावा, जातीय सलोखा निर्माण व्हावा, म्हणून राणीच्या बागेत एकात्मता मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात ६०,००० मुंबईकर सहभागी होते. या त्यांच्या कर्तृत्वासाठी ब्रिटीश सरकारने जस्टिस ऑफ पीस पुरस्कार आणि रावबहादूर ही सनद बहाल करुन त्यांचा सन्मान केला. रावबहादूर ही सनद मिळालेले नारायण मेघाजी लोखंडे हे पहिले पत्रकार होय. समाजामध्ये एकजूट प्रस्थापित व्हावी, म्हणून ते नेहमी दक्ष असत. लोकमान्य टिळक आणि आगरकर यांनी बहुजन हिताची भूमिका घेतल्याबद्दल नारायण मेघाजी लोखंडे यांनी त्यांचा मानपत्र देऊन जाहीर सन्मान करण्यात पुढाकार घेतला. तसेच सामाजिक सुधारणेच्या भूमिकेतून नारायण मेघाजी लोखंडे यांनी ''पंचदर्पण'' हे छोटेखानी पुस्तक लिहिले. यामध्ये समाजस्वास्थ्य आणि नैतिकता या दृष्टीने मांडलेले विचार हे मार्गदर्शक आणि आदर्श असे आहेत. त्यांनी सांगितलेले नऊ नियम- १) स्त्री शिक्षण, २) लग्नाचे वय, ३) पुनर्विवाह, ४) विधवा विवाह, ५) लग्नातली उधळपट्टी, ६) व्यसने, ७) घटस्फोट, ८) सहकार, आणि ९) बचत, यासबंधीचे विचार आजच्या घडीला देखील सर्वांना मार्गदर्शक असेच आहेत. महात्मा फुलेंनी जाणीवपूर्वक वापरलेला ''शुद्रातिशुद्र'' हा शब्द आणि लोखंडेनी वापरलेला ''मराठा'' हा शब्द म्हणजे ब्राम्हणेतरांच्या व्यापक एकजुटीची संज्ञा होय. नारायण मेघाजी लोखंडेंनी मराठा ऐक्येच्छु सभा, मराठा प्रॉव्हीडंट फंड, मराठा हॉस्पिटल या संस्थांची स्थापना करुन व्यापक समाजकार्य करण्याचा निर्धार केला होता. त्यांनी ''दीनबंधू'' मधून मराठा म्हणजे महाराष्ट्रातील सर्व ब्राम्हणेतर मराठा ऐक्येच्छु सभा स्थापन केली.

१८९६ च्या अखेरीस मुंबई परिसरात प्लेगच्या साथीने भीषण रुप धारण केले होते. माणसे मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडू लागली. गोर-गरीब कष्टकऱ्यांना औषधोपचार मिळावेत यासाठी त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भायखळा येथे मराठा हॉस्पिटलची स्थापना केली. रोगग्रस्तांना मदत करण्यात लोखंडे अतिशय व्यस्त होते. पण या गोरगरीब कष्टकऱ्यांची देखभाल करता-करता खुद्द कै. नारायण मेघाजी लोखंडेंना प्लेगची लागण झाली, याची त्यांना कल्पना आली नाही आणि मंगळवार दिनांक ९ फेब्रुवारी १८९७ रोजी पुणे येथे त्यांचे आकस्मिक निधन झाले आणि संपूर्ण कष्टकरी कामगार चळवळ, सामाजिक चळवळीवर शोककळा पसरली. नारायण मेघाजी लोखंडे यांनी आपले संपूर्ण आयुष्य उपेक्षित, गोर-गरीब कष्टकरी कामगार बहुजन समाजाच्या हितासाठी वेचले. त्यांचा लढा, त्यांची चळवळ ही विषमतेविरुध्द आणि शोषणमुक्त समाजासाठी होती. आज कष्टकरी कामगारांच्या आयुष्यात ज्या काही कमी अधिक प्रमाणात सोई-सुविधा दिसून येतात. त्यापाठीमागे कै. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या त्यागाचा आणि कर्तृत्वाचा इतिहास आहे. तेव्हा त्यांचा लढा हा समग्र सामाजिक परिवर्तनाचा लढा होता. त्यांच्या आदर्शवत कार्याचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचा दृष्टिकोन सध्याच्या कामगार चळवळीतील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी अधिक व्यापक प्रमाणात आत्मसात करुन कामगार चळवळ अधिक सक्षम करण्याची काळाची गरज आहे. गोर-गरीब कष्टकरी वर्गाच्या कल्याणासाठी कामगार चळवळीचा वापर झाला पाहिजे. देशाच्या सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत हे अपेक्षित असून, त्यादृष्टीने सर्वांनीच प्रयत्न करण्याची गरज आहे. नारायण मेघाजी लोखंडे यांना अभिप्रेत असलेले नवसमाज घडविण्याचे अधूरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हीच खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल. नारायण मेघाजी लोखंडे यांचे नांव कामगार कायद्यांचे प्रशिक्षण देणाऱ्या महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेला देऊन शासनाने त्यांचा यथोचित गौरव केला आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!!! गिरणी कामगार संघटना स्थापन दिनाच्या समस्त कामगार बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

**- संकलन व सुलेखन-**
**यशोधक- श्री कृष्णकुमार आनंदी-घोविंदा निकोडे गुरुजी.**
**. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# कोरडा दुष्काळ जाहीर करा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

### छावा संघटनेचे तहसीलदारांना निवेदन; हेक्टरी एक लाख मदतीसह चारा, पाणी व वीजपुरवठ्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : अल्प पावसामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पाणीटंचाई आणि चाऱ्याच्या अभावामुळे शेतकरी व पशुपालक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर कळंब तालुक्यासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या बाबत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर मदत देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

पशुधन वाचविण्यासाठी गावागावांत पुरेसा चारा व पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, आवश्यक ठिकाणी चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पाणीटंचाई असलेल्या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांना दिवसा किमान आठ तास सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

तसेच ऊस उत्पादकांच्या बिलाचा प्रश्नही ऐरणीवर आला असून गूळ पावडर व गूळ निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना ऊस खरेदीसंदर्भातील शासकीय नियमांच्या कक्षेत आणून शेतकऱ्यांना उसाचे योग्य व वेळेत बिल मिळण्याची व्यवस्था करावी. निफाडच्या धर्तीवर ऊस उत्पादकांना योग्य दराने उसाचे बिल अदा करण्याची कार्यवाही करावी, तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क माफ



करून शासनाच्या शैक्षणिक सवलती व मदत योजनांचा तातडीने लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सदरील मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन शेतकरी, पशुपालक व विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. या वेळी अखिल भारतीय छावा संघटनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील, तालुकाध्यक्ष विठ्ठल यादव, शेतकरी नेते बब्रुवान गोरे, संदीप बिडवे, वसुदेव पाचंगे, उमाकांत शेळके, ज्ञानेश्वर पाटोळे, भैय्या टोपे, अविनाश बाकले, श्रीकांत थिटे यांच्यासह शेतकरी व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी सांस्कृतिक मंडळातर्फे श्री गणरायाची भक्तिभावाने आरती

## आमदार सचिन कल्याणशेट्टी व महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते आरती संपन्न; मनिधारी सोसायटीतील सीसीटीव्हीसाठी १० लाख, वॉकिंग ट्रॅकसाठी २० ते २५ लाख रुपयांची निधी तरतूद करण्याचे महापौरांचे आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात श्री गणरायाची आरती अक्कलकोटचे आमदार श्री. सचिन दादा कल्याणशेट्टी आणि सोला-पूर महानगरपालिकेचे महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांच्या हस्ते भक्तिभावाने संपन्न झाली. यावेळी परिसरातील नागरिक, मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

श्री गणरायाच्या आरतीनंतर आमदार श्री. सचिन दादा कल्याणशेट्टी आणि महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांनी उपस्थित नागरिक व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.







दोन्ही मान्यवरांनी मंडळाच्या व सोसायटीच्यावतीने चालू असलेल्या कार्याचे कौतुक केले व सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिलें गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य मंडळाच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

यावेळी मनिध-ारी सोसायटीच्या विविध विकासकामांबाबत मंडळाचे पदाधिकारी व नागरिकांनी महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांच्याशी चर्चा केली. सोसायटी परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने वॉकिंग ट्रॅक उभारण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या मागणीची दखल घेत महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांनी मनिधारी सोसायटी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी १० लाख रुपये तसेच वॉकिंग ट्रॅकच्या कामासाठी २० ते २५ लाख रुपयांची निधी तरतूद करण्याचे आश्वासन दिले. आवश्यक निधीची तरतूद करून ही दोन्ही विकासकामे लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे महापौरांनी यावेळी सांगितले. आमदार कल्याणशेट्टी यांनी हिंदूंनी धार्मिक परंपरा जपण्याचे आवाहन केले.

सीसीटीव्हीमुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला बळकटी मिळणार असून, वॉकिंग ट्रॅकमुळे ज्येष्ठ नागरिकांसह सर्व वयोगटातील नागरिकांना आरोग्यदायी सुविधा उप-लब्ध होणार आहे. महापौरांनी दिलेल्या या आश्वासनाबद्दल मनिधारी सोसायटीतील नागरिक व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्रद्धानंद नरोणे, उपाध्यक्ष शिवानंद मुनोळी,माजी नगरस-ेवक राजकुमार हंचाटे,फौजदार म्हाळपा सुरवसे, प्रजात दशरथ वडतिले, शंकर गाडी, गुरुशांत ढंगे, सुरेश येलमेळी, काशिनाथ बिराजदार, सिद्धेश्वर श्रीगाडी, शिवया मसुती, गजानन हो-नराव ,प्रा. नितीन पतंगे तसेच सोसायटीच्या चेअरमन अंजली माशाळकर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

श्री गणरायाच्या आरतीनिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले यांनी केले.

# कर्मवीरांच्या विचारांचा जागर करत पंढरपुरात अभिवादन रॅली







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय व यशवंत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त भव्य अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीच्या प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीच्या सदस्य सौ. सुनेत्राताई पवार, अमरजीत पाटील, जे. बी. भायगुडे, डॉ. राजेंद्र जाधव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांची प्रमुख उप-स्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून रॅलीस प्रारंभ करण्यात आला.

रॅलीमध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना , राष्ट्रीय सेवा योजना (छडड), कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक शाखे-तील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थिनींच्या झांजपथकाने ढोल-ताशांच्या निनादात उत्स-ाहपूर्ण सादरीकरण केले. तसेच लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी आदी पारंपरिक युद्धकला व क्रीडा प्रकारांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या हातातील फलकांवर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची तसेच रयत शिक्षण संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती देण्यात आली होती. ध्वनिक्षेपकावरून कर्मवीरांच्या शैक्षणिक विचारांचा, त्यांच्या संघर्षमय जीवनाचा आणि उपेक्षित, वंचित व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने केलेल्या कार्याचा जागर करण्यात आला.

शहरातील मान्यवरांकडून कर्मवीरांना अभिवादन

रॅलीदरम्यान पंढरपूर शहरातील विविध म ान्यवर, नागरिक, संस्था व माजी विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याम ध्ये शंकर खरात, तानाजी खरात, नवनाथ खरात (हॉटेल अहिल्या, पंढरपूर), शिवाजी कोळी, बाळासाहेब वसंतराव नेहतराव, भारत भिंगे (नवी पेठ), पावले किराणा स्टोअर्स (नवी पेठ), नाथ चौक तरुण मंडळ व म ाजी विद्यार्थी संघ, महादेव आदापुरे (नाथ चौक), मंगेश देशपांडे (नाथ चौक), राजेंद्र निंबाळकर, शिवम ज्वेलर्स (सावरकर चौक), कर्नल भोसले चौक तरुण मंडळ, पंढरपूर, प्रा. सुदाम गायकवाड, रमेश एकनाथ पाटील, सुभाष भोसले (माजी नगराध्यक्ष) आणि जयवंतराव माने यांचा समावेश होता.



या सर्व मान्यवरांनी व संस्थांच्या प्रतिनिधींनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या म हान शैक्षणिक कार्यास अभिवादन केले.

फुलांनी आकर्षक सजवलेल्या रथामध्ये ठेवण्यात आलेली कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्रतिमा हे रॅलीचे विशेष आकर्षण ठरले. रॅलीच्या मार्गावर नागरिकांनी कर्मवीरांच्या प्रतिमेचे उत्स्फूर्त स्वागत करून अभिवादन केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले कार्य, शिक्षणासाठी केलेला संघर्ष, 'कमवा आणि शिका' या विचारातून विद्यार्थ्यांना दिलेली प्रेरणा आणि समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे त्यांचे ध्येय यांचा प्रचार व प्रसार करणे, त्यांच्या कार्याचा सन्मान करणे आणि त्यांच्या शैक्षणिक विचारांची नव्या पिढीला ओळख करून देणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश होता.

रॅलीच्या यशस्वी आयोजनामध्ये म हाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना खाऊ व पिण्याचे पाणी वितरित करण्यात आले. पंढरपूर नगरपालिका तसेच पंढरपूर शहर पोलीस प्रशासनाने रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी, नागरिक आणि कर्मवीरांच्या कार्याशी आत्म ीयता असलेले विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले. कर्मवीरांच्या विचारांचा जागर, त्यांच्या शैक्षणिक कार्याचे स्मरण आणि रयत शिक्षण संस्थेच्या सम ाजविकासातील योगदानाची जाणीव करून देणारी ही रॅली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

### तंजावर (तामिळनाडू) मध्ये रंगणार ऐतिहासिक साहित्य संमेलन

### तमिळ आणि मराठी साहित्य संस्कृतीचा संगम

# तामिळनाडूमध्ये देशभरातून आलेल्या मराठी साहित्यिकांचे जल्लोषात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित दक्षिण भारतातील पहिलेच मराठी साहित्य संमेलन २३ सप्टेंबर रोजी तंजावर (तामिळनाडू) येथे संपन्न होत आहे. छत्रपती शिव-ाजी महाराजांचे बंधू व्यंकोजी महाराजांची वारसदार सरफोजी राजे दुतीय यांनी दक्षिण भारतात मराठी साहित्य, संस्कृती, कला, शिक्षण, आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. तमिळ आणि मराठी साहित्य संस्कृतीचा संगम सरफोजी राजांनी घडवून तंजावर मध्ये सव्वा तीनशे प्रथमच मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.



या संमेलनासाठी महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, राजस्थ-ान, कर्नाटक ,दिल्ली, गुजरात, गोवा, आंध्र प्रदेश, अशा विविध भागातून शेकडो साहित्यिक रेल-वेद्वारे चेन्नईमध्ये दाखल झाले आहेत. यावेळी तंजावरच्या संतांचे युवराज आणि साहित्य संमेलनाचे नियंत्रक युवराज संभाजी राजे भोसले अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि सरफोजी राजे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉक्टर शरद गोरे यांनी सर्व साहित्यिकांचे जल्लोषात स्व-ागत केले सर्व साहित्यिकांना पुष्प आणि मानसन्मान देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी पंढरपूर मधून सोलापूर पर्यंत पायी चालत आलेल्या आणि तिथून रेल्वे द्वारे तामिळनाडू चेन्नई येथे पोहोचलेल्या पंढरपूरकरांच्या ग्रंथ दिंडीचे पूजन करून विशेष स्व-ागत करण्यात आले.

चेन्नई ते रेल्वे स्थानकावर छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती संभाजी राजे यांच्या जय जयकारांच्या घोषणा देण्यात आल्या. रेल्वे स्थानकातून सर्व साहित्यिक पंढरीची ग्रंथ दिंडी घेऊन मराठीच्या जयजयकार करत महाबलीपुरम मार्गे विशेष वाहन व्यवस्थेने एकत्रित संमेलनासाठी रवाना झाले आहेत सरफोजी राजे द्वितीय मराठी साहित्य संमेलन हे ग्रंथदिंडी उद्धाटन परिसंवाद कवी संमेलन साहित्य पुरस्कार आणि समारोप अशा १७ पार पडणार आहे याद्वारे पश्चिम भार-तात मराठीचा जागर होणे कला साहित्यिकांनी सांस्कृतिक दृष्ट्या मराठी व तमिळ भाषेचा एकमेव का कायम राहावा हाच त्याम ागील उद्देश आहे.

मराठा संस्थांनी प्रमुख छत्रपती बाबाराजे भोसले हे या संमेलनाचे उद्घाटक असून माजी मंत्री प्राध्यापक लक्ष्मणराव ढोबळे हे या संमेलनाचे स्वागत अध्यक्ष आहेत ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर शरद गोरे हे या संमेलनाचे अध्यक्ष असून त्यांचाच मार्गदर्शनाखाली हे संमेलन पार पडत आहे.

# आट्यापाट्या सामन्यात कौठाळी संघ प्रथम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील चळे दर्लिंग आट्यापाट्या संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या आट्यापाट्या सामन्यांमध्ये कौठाळी येथील जय हनुमान आट्यापाट्या संघाने प्रथम क्रमांकाचे २१ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले

या संघामध्ये प्रशांत नागटिळक ,कैलास नागटिळक,सोमनाथ सप्ताळ, प्रवीण कांबळे, सचिन नागटिळक, तेजस कदम या खेळाडूंनी सहभाग घेतला. विजयी संघाचे कौठाळी ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# सोलापुरात मोठा दरोडा फसला सात जणांच्या टोळीला पोलिसांनी केली अटक

## १० लाख २९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सोलापूर शहरात पाठीच्या दरम्यान दरोडे टाकण्याचे तयारीत असलेले सात गुन्हेगाराच्या टोळीला शहर गुन्हे शाखेच्या पथकाने शेतकरी अटक केली आहे व त्यांच्याकडून एक देशी बनवते पिस्तूल, उपास जिवंत राऊंड घातक शस्त्रे व महिंद्रादणत५०० दुचाकी सरी एकूण१०,२९,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तांची मला विषय घेण्याच्या प्रतिबंधक करण्याचे आधी दिले होते त्या अनुषंगाने दिनांक २०/०९/२०२६ रोजी रात्री झोपू भारत चंदनशिवे व त्यांचे पथकं आयडीसी पोलीस ठाणे हद्दीत गस्त व पेट्रोलियम करत असताना पो.शि. १६६४ अमोल यादव यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की काहीही प्लॉट नंबर ८३ अमर ज्योती नगर नर्सिंग नगरची शेजारी मुळेगाव रोड सोलापूर येथील दरोडेच्या तयारी दमले आहेत. या माहितीवरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अरविंद माने आणि सहाय्यक पोलीस आयुक्त श्री दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला व तिथे एका क*** रंगाची चार चाकी वाहन क्रमांक इमेज १२ ७०० आणि मोटरसायकल क्रमांक ६४ ६७ व सात संशयित विषम आढळले व त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केल्या असता त्यांनी दरोडेची तयारी केल्याची कबुली दिली.

मनदीप सिंग दयासिंग संधू ४३ राहणार गुरुद्वार लंगर साहेब नांदेड बलपतसिंग सतमान सिंग खैरा वय २५ राहणार नांदेड अंकुर राजकुमार प्रतापसिंह वय २८ राहणार कारवा जिल्हा पटना बिहार लक्ष्मण नामदेव जगताप वय ३५ राहणार भाग गाव औरंगाबाद सुखदेव सिंग बागलसिंग वय ४२ राहणार पंजाब, दिलीप सिंग हरित सिंग खालसा वय ३४ राहणार नांदेड, राजेश खनीराम राठोड व ४४ राहणार नरसिंह नगर मुळेगाव रोड सोलापूर अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

०१ देसी पिस्टल ०५ जिवंत राऊंड ०२ तलवार, ०३ खंजीर, ०२ कटवाणी, ०१ छत्री, ०१ कलर स्प्रे बॉटल, ०७ मोबाईल०१दणत५००,०१ यमा म



ोटरसायकल, आरोपी राजेश राठोड यांनी सांगितले आज रात्री ते पहाटे दरम्यान आम्ही सोलापूर शहरामध्ये दररोज टाकून लूट करणार होतो त्याकरता आम्ही दिवसभरात पूर्व तयारी करून हत्यारे व सामान जमा केले आहे.

याप्रकरणी पो.शि. अमोल यादव यांनी फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुरा नं.ब. ८४७/२०२६भा.न.स. कलम ३१० (४) सह भारतीय हत्यार कायदा कलम३/२५,४/२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम३४/(१)(२,)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासात आरोपीवर खून व खुनाचा गुन्हा दरोडा घर पुढे जबरी चोरी हत्यार कायद्यान्वये गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त मा श्री यमराज कुमार पोलीस उप आयुक्त पुणे डॉक्टर अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सह पोलीस आयुक्त श्री दिलीप पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अरविंद माने सहपोलीस भारत चंदनशिवे निलेश सोनवणे पोलीस उपनिरीक्षक विजय बनसोडे मनोज मोरे व त्यांची पथक आणि सायबर पोलीस ठाण्याकडील मच्छिंद्र राठोड श्याम सुरवसे व चालक यांनी काम केले आहे.

# पंढरपूरला 'अपर जिल्हाधिकारी' कार्यालयाचा मार्ग मोकळा!

## आमदार समाधान आवताडेंच्या पाठपुराव्याला यश; सात तालुक्यांचा कारभार पंढरपूरच्या छत्राखाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : पंढरपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यान्वित करण्याच्या मागणीला अखेर यश आले आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत राज्याच्या महसूल विभागाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी पंढरपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यान्वित करण्यास मान्यता देणारा शासन निर्णय जारी केला आहे.

सोलापूर जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार, वाढती लोकसंख्या आणि नागरीकरण लक्षात घेता पंढरपूर, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला, मोहोळ व मंगळवेढा या तालुक्यांतील नागरिकांना जिल्हास्तरीय महसूल कामांसाठी सोलापूरला जावे लागत होते. नागरिकांची गैरसोय दूर करून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने पंढरपूर येथे स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



शासन निर्णयानुसार पंढरपूर, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला, मोहोळ आणि मंगळवेढा हे सात तालुके पंढरपूर अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राहणार आहेत. तर सोलापूर अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी आणि अक्कलकोट हे चार तालुके राहतील.

नवीन कार्यालयासाठी अपर जिल्हाधिकारी व तहसीलदार यांची पदस्थापना शासनस्तरावरून करण्यात येणार असून, इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांची पदस्थापना जिल्हाधिकारी करतील. सुरुवातीला तात्पुरती जागा निश्चित करून कार्यालय सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर कायमस्वरूपी जागा शोधून कार्यालयाच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश आहेत. या कार्यवाहीचा १५ दिवसांत शासनाला अहवाल सादर करावा लागणार आहे.

तरी, सदर प्रस्तावांच्या बाबत मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर राज्याचे महसूल सचिव विकास खारगे यांची भेट घेत पंढरपूर अपर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर करण्याबाबत त्वरित शासन निर्णय जाहीर करण्याचे सांगितले. त्यानंतर तात्काळ हा निर्णय मंजूर करण्यात आला.

या निर्णयाने, पंढरपूरसह सात तालुक्यांच्या नागरिकांना महसूल प्रशासन अधिक जवळ येणार असल्याने या निर्णयाचे महत्त्व वाढले आहे. या निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई ताई पवार, आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आमदार समाधान आवताडे यांनी आभार मानले आहेत.

# अनधिकृत बांधकामाविरोधात नितीन भालेराव यांचे उपोषण; उल्हासनगर मनपाच्या कारवाईकडे लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे उल्हासनगर : वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी नितीन भालेराव यांच्या घराशेजारी अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला असून, याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेकडे तक्रार करूनही संबंधित ठिकाणी कारवाई होत नसल्याने भालेराव यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.




भालेराव यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित बांधकाम नालीलगत सुरू असून त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या बांधकामाबाबत त्यांनी यापूर्वी उल्हासनगर महानगरपालिकेकडे लेखी तक्रार करून कारवाईची मागणी केली होती. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा त्यांचा आरोप आहे.

या प्रकरणात संबंधित मुकादम व अधिकारी बांधकामाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नितीन भालेराव यांनी केला आहे. महानगरपालिका प्रशासनाने तातडीने या बांधकामाची पाहणी करून ते अधिकृत आहे की अनधिकृत, याची पडताळणी करावी तसेच नालीलगतच्या बांधकामामुळे आरोग्य व स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होत असल्यास आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघासाठी २३ ऑक्टोबरला मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर मतदार संघ आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे.

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून अरुण लाड आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत आसगावकर या विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकांची घोषणा केल्यापासून संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे.

या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे.

पुणे विभागात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून त्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्ष, प्रशासकीय विभाग यांनी भारत निवडणूक आयोगाच्या वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे, असे आवाहन पुणे विभाग पदवीधर मतदार संघ आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली - उगले यांनी केले आहे.

# विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : दि. २२ :- अक्कलकोट येथे विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही १४ व्या गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेतून गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक, साहित्यिक आणि सामाजिक विषयांवरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून बौद्धिक व सामाजिक प्रबोधनाचा उद्देश असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा विवेकानंद प्रतिष्ठानचे मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर यांनी पत्रकार परिषदेत व्याख्यानमालेची माहिती दिली. यावेळी विवेकानंद प्रतिष्ठानचे सदस्य मल्लिकार्जुन मसुती सर, अशोक येणगुरे, मनोज कल्याणशेट्टी, संतोष जिरोळे, गुरुपादप्पा आळगी तसेच व्यवस्थापक चंद्रकांत दसले आदी उपस्थित होते.

व्याख्यानमालेतील




कार्यक्रम

२९ सप्टेंबर २०२६ : तुफान विनोदी नाटक 'शिक्कामोर्तब' प्रमुख कलाकार कांचन पगारे, कृतिका तुळसकर, स्नेहा पराडकर आणि सागर कारंडे

३० सप्टेंबर २०२६ : 'मेर्मबंधातली ठेव' भावगीते, भक्तिगीते व चित्रपटगीते सादरकर्ते प्रथमेश लघाटे व मुग्धा वैशंपायन

१ ऑक्टोबर २०२६ : सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांचा 'जाऊ कवितांच्या गावा'

२ ऑक्टोबर २०२६ : पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे व पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांच्याशी 'मेळघाटातील आरोग्यदूत' या विषयावर माधव देशपांडे संवाद साधणार.

३ ऑक्टोबर २०२६ : अमृतवक्ता मा.स्वानंद बेदरकर यांचा 'वंद्य वंदे मातरम्'

४ ऑक्टोबर २०२६ : 'म्हणून स्वातंत्र्यवीर' या कार्यक्रमात लेखक नितीन वाघ, प्रमुख कलाकार प्रसन्न केतकर व संच सहभागी होणार आहेत.

ही व्याख्यानमाला उत्साहात पार पडणार असून, रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ६३ ग्रॅमचऊव चार चाकी वाहन मोबाईल्स एकूण ९, ८९,०००/रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत

# कुर्डूवाडी शहरात मेफे ड्रोन ड्रग विक्रीसाठी घेऊन येणार आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आम्ही पदार्थ व त्याचे पासून तयार झालेली इतर नशेचे पदार्थ यांच्यावर क** कारवाई करण्याबाबत शासनाकडून विविध प्रकारचे प्रयत्न करण्यात येत असून सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडून देखील अमली पदार्थ विषयी जनजागृती व कारवाई अशी दुहेरी काम करण्यात येत आहे यामध्ये दिनांक १८ रोजी अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी जिल्ह्यात महत्त्वाचे विभागाची (छ-उजीव समिती,) बैठे घेऊन आपली पदार्थबाबत क** कारवाई करण्याबाबत सूचना दिले आहेत.

सदर बैठक झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी जिल्ह्यातील अमली पदार्थ विषयक गुन्हे करणारे इसमावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या हालचालीवर लक्ष केंद्रित होते त्यामध्ये गोपनीय बातमीदाराकडून यांच्याकडून कुर्डूवाडी पोलीस ठाणे हद्दीत मेफे ड्रोन ड्रग(चऊ) अमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत गोपनीय माहिती संजय जगताप पोलीस निरीक्षक यांना प्राप्त झाली होती. या बातमीवरून पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी कुर्डूवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत करमाळा रोड वरून कुर्डूवाडी शहराकडे



इसम नामे सोहेल अमर मुलांनी राहणार कुर्डवाडी हा त्यांच्याकडील चार चाकी वाहन वरून मेळे ड्रोन ड्रग्ज (चऊ) अमली पदार्थ विक्रीसाठी सोबत घेऊन येत आहे सदर इसमावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत अतुल मोहिते पोलीस निरीक्षक कुर्डूवाडी पोलीस ठाणे यांना सांगून साईट पोलीस निरीक्षक भीमगोंडा पाटील नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा यांना मदत करण्याबाबत आदेश दिले.

याप्रमाणे अतुल मोहिते पोलीस निरीक्षक, कुर्डूवाडी पोलीस ठाणे यांना सांगून साईट पोलीस निरीक्षक भिमगोंडा पाटील नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा यांना मदत करण्याबाबत आदेश दिले त्याचप्रमाणे अतुल मोहिते पोलीस निरीक्षक कुर्डूवाडी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली साई पोलीस निरीक्षक देवगोंडा पाटील साहेब पोलीस निरीक्षक गटकुळ पोलीस हवालदार सलीम बागवान अजय भोसले विजय भरले पोलीस कॉन्स्टेबल सागर ढोरे पाटील प्रमोद चिपळे किरण चव्हाण आर वर आधार पोलीस कॉन्स्टेबल दिलीप थोरात तसेच कुर्डूवाडी पोलीस ठाणे कडील पोलीस हवालदार सुशांत शिंदे संतोष मोरे हेड कॉन्स्टेबल फुलं कस्तुरे पोलीस कॉन्स्टेबल समीर पठाण पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय शिंदे यांनी पार पडले आहे.

# वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व जनता सामाजिक संस्था यांच्या वतीने दहिटणे येथे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल ४० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्रामुख्याने पाच विषय देण्यात आले होते. छोटा गट व मोठा गट अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांनी मनोगत व भाषणे सादर केली. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. तसेच छोटा गट व मोठा गट यामधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमास अक्कलकोटचे डीवायएसपी मा. टाकणे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच दहिटणे गावचे सरपंच नितीन दादा मोरे, ज्ञानगंगा प्रशालेचे मुख्याध्यापक सुरवसे सर, सचिन सर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बिराजदार सर, जोजन सर, पवार सर, अरुण पोपसपट गुरुजी, चनवीर बोदले, दत्तां गजाकोस, अमोल सहशिक्षिका यास्मिन शेख माने, अमोल मोरे, उशिनी मुजावर, मधुकर मोरे ज्योतिबा रसनभैरे अमोघसिद्ध कलगुडगी, गुंडू कुंभार, धनाजी कांबळे ज्ञानेश्वर गरडे शांतनू पाटील सद्दाम नदाफ सिद्धू गुरुजी महादेव गुरुजी फुलचंद चव्हाण, बाळू सुतार, टाटा मोटर्सचे राठोड दादा, शेख तसेच गावातील व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून बनसोडे सर यांनी जबाबदारी पार पाडली. विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या वक्तृत्वकलेला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला.